# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 18 November 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १८ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा प्रचार थांबला- परवा मतदान
- राज्यभरात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी एक लाख ४२७ मतदान केंद्रं
- जाहीर सभा, रोड शो, आणि मतदारांच्या गृहभेटींसह पत्रकार परिषदा घेण्यावर नेत्यांचा कल

आणि

- ऑक्टोबरसाठी जीएसटी कर विवरणपत्रं भरण्यास २१ तारखेपर्यंत मुदतवाढ

****

विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा प्रचार आज थांबला. राज्यात विधानसभेच्या २८८ तसंच नांदेड लोकसभेच्या एका जागेसाठी परवा बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्यभरातल्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी, एक लाख ४२७ मतदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मतदान पथकं रवाना होत आहेत.

मतदानापूर्वीच्या या शांतता काळात, मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या, निवडणूक निकालावर परिणाम करणाऱ्या बाबी प्रदर्शित करण्यास निवडणूक आयोगाने माध्यमांना मनाई केली आहे. दृकश्राव्य माध्यमांनी अशा बातम्या प्रदर्शित करु

नयेत. तसेच राजकीय जाहिराती, कार्यक्रम, सार्वजनिक सभा, मिरवणुका आयोजित करण्यास बंदी घालण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. प्रशासनाकडून मतदान प्रक्रियेची संपूर्ण तयारी झाली असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

****

मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविण्यासाठी मतदार छायाचित्रासह इतर १२ पुराव्यांपैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात यावा अशा निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत. यामध्ये वाहन चालवण्याचा परवाना, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा टपाल खात्याचे छायाचित्र असलेले पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक यांनी दिले स्मार्ट कार्ड, विशिष्ट दिव्यांगत्व ओळखपत्र, आदीचा समावेश आहे.

****

नांदेड लोकसभा मतदार संघातल्या मतदारांना परवा दोन वेळा मतदान करायचं आहे. एकाच मतदान केंद्रावर पहिलं मतदान लोकसभा पोटनिवडणुकीसाठी तर दुसरं मतदान विधानसभा निवडणुकीसाठी असेल. जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदार संघातल्या मतदारांनी याची खबरदारी घेण्याचं आवाहन करत, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली.

> ***नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, भोकर, नायगाव, देगलूर आणि मुखेड या विधानसभा क्षेत्रांमध्ये दोन ई व्ही एम चे सेट राहतील. एक लोकसभेसाठी असेल, ती पांढऱ्या रंगाची मतपत्रिका असेल त्यावर पांढऱ्या रंगाचे स्टीकर असतील. आणि एक असेल तो विधानसभेकरीता ज्यावरती गुलाबी रंगाचे स्टीकरर्स असतील आणि मतपत्रिकासुद्धा गुलाबी रंगाची असेल. आणि आपण एकाच मतदान केंद्रावर जाणार. त्याठिकाणी आपली ओळख पटवून दिल्यानंतर आपण पहिले लोकसभेचं मतदान कराल. त्यानंतर विधानसभेचं मतदान कराल. अशा प्रकारे दिनांक २० नोव्हेंबरला नांदेड लोकसभा***

***क्षेत्रातले जे मतदार आहेत, त्यांना ही एक अनोखी संधी आलेली आहे की आपल्याला एकाच वेळी दोन मतं द्यायची आहेत.***

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व नऊ मतदार संघातल्या मतदान केंद्रांवर उद्या दुपारपर्यंत मतदान साहित्य घेऊन मतदान पथकं पोहचणार असल्याची माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते. एकूण १८ हजार १७८ मनुष्य बळ मतदान प्रक्रियेसाठी कार्यरत राहणार असून, त्यांच्या वाहतुकीसाठी सुमारे ११ हजार वाहनांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती स्वामी यांनी दिली.

***आपल्या जिल्ह्याभरात एकूण ३ हजार २७३ मतदार केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. याची संख्या लक्षात घेता बॅलेट युनिट जे लागणार होते ते ७ हजार ४३० बॅलेट युनिट लागणार होते, त्यामध्ये २० टक्के आपण राखीव धरतो. कंट्रोल युनिट ३ हजार ९१७ लागणार आहे. त्या पैकी २० टक्के आपण राखीव ठवलेल आहे आणि व्ही व्ही पॅड ४ हजार २४३, ३० टक्के राखीव धरून कुठल्या यंत्रणेच्या बाबतीत यंत्राच्या बाबतीत आपल्याकडे कुटल्याही काळजीचा विषय आपल्या जिल्ह्यात नाही.***

****

जालना जिल्ह्यात पाचही विधानसभा मतदार संघातल्या मतदान केंद्रावर जाणाऱ्या निवडणूक पथकांची तिसरी सरमिसळ प्रक्रिया आज निवडणूक आयोगाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे पूर्ण करण्यात आली. या प्रक्रियेनुसार, कोणत्या मतदान केंद्रावर कोणते पथक जाईल, हे मतदानाच्या एक दिवसापूर्वी म्हणजे उद्या संबंधित पथकांना कळवण्यात येणार आहे. त्यानंतर ही पथकं मतदानाचं संपूर्ण साहित्य घेवून मतदान केंद्राकडे रवाना होणार असल्याचं जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितलं.

****

दरम्यान, आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, पत्रकार परिषदा, जाहीर सभा आणि रोड शो सोबतच पदयात्रा आणि मतदारांच्या गृहभेटी घेण्यावर उमेदवारांचा कल दिसून आला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. राज्यातले अनेक उद्योग, तसंच धारावी विकास कंत्राटावरून त्यांनी, केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली.

दरम्यान, उद्योजक गौतम अदानी यांचा उदय खऱ्या अर्थानं काँग्रेसच्या नेतृत्वातील युपीए सरकारच्या काळातच झाला असल्याचा दावा भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केला आहे. राहुल गांधी यांच्या आरोपांचं खंडन करण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महायुतीच्या काळात एकही प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला नसल्याचं सांगत यासंदर्भात राहुल गांधी यांनी जाहीर चर्चेला यावं असं आव्हानही तावडे यांनी दिलं.

****

काँग्रेसचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर इथं आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली, यावेळी त्यांनी महागाई, बेरोजगारी, तसंच शेतीमालाला हमीभाव आदी मुद्यावरून टीका केली.

****

मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनीही आज मुंबईत पत्रकार परिषद घेत, आपल्या सरकारच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध योजनांचा आढावा घेतला.

****

महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांची वसई येथे प्रचार सभा झाली. तर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी नवी मुंबईत बेलापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांच्या प्रचारासाठी नेरूळ इथल्या रामलीला मैदानावर सभा घेतली.

****

अनेक ठिकाणी पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी सांगता सभा घेऊन आपल्या तसंच पक्षाच्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचाराचा समारोप केला. धुळे शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे भाजप उमेदवार अनुप अग्रवाल यांच्या जाहीर प्रचाराची सांगता आज महिला बाईक रॅली काढून करण्यात आली.

****

चालू आर्थिक वर्षात ऑक्टोबरसाठी जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर विवरणपत्र ३ बी भरण्याची मुदत महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांमधे एका दिवसानं म्हणजे २१ तारखेपर्यंत वाढवण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. जीएसटी अंमलबजावणी समितीच्या मान्यतेनंतर सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

****

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने, मनपा हद्दीमध्ये असलेल्या चार विधानसभा मतदार संघात प्रत्येकी एक आदर्श मतदान केंद्र तयार होत आहे. या मतदान केंद्रात मतदारांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध असणार आहेत. प्रतीक्षागृह, महिलांसाठी प्रतीक्षागृहात बसण्याची वेगळी व्यवस्था, बालकांसाठी पाळणाघर तसंच विविध खेळणी, पिण्याचे पाणी, प्रत्येक बूथ पर्यंत जाण्यासाठी रेड कार्पेट, आरोग्य सुविधा, सेल्फी पॉईंट, स्वागत कक्षामध्ये मतदारांना यादीत नाव शोधण्यापासून बुथची माहिती सांगण्यासाठी नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून नेमण्यात आलं आहे. विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी, हा या मागचा उद्देश आहे.

****

येत्या बुधवारी २० तारखेला सर्वांनी मतदान करण्याचं आवाहन अभिनेते संजय नार्वेकर यांनी केलं आहे.

**बाईट – अभिनेते संजय नार्वेकर**

****

निवडणूक विभागाच्या पथकानं आज सकाळी नाशिक शहरातील रेडीसन ब्ल्यू या हॉटेलमध्ये टाकलेल्या छाप्यात कोट्यवधी रूपयांची रोकड जप्त केली आहे. अद्यापही रोकड मोजण्याचं काम सुरू असून नोटा मोजण्यासाठी दोन मशिन्सचा वापर केला जात असल्याचं याबाबतच्या बातमीत म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजपर्यंत चार हजार ७१ मतदारांनी गृहमतदान केलं असून हे प्रमाण ७९ टक्के एवढं आहे. टपाली मतदान नऊ हजार ६९९ एवढं झालं असून, त्याचं प्रमाण ७३ टक्के असल्याचं, निवडणूक कार्यालयाकडून सांगण्यात आलं आहे.

****

परभणी विधानसभा मतदार संघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार डॉ राहुल पाटील यांच्या प्रचाराचा शेवट आज ऑटो रिक्षा रॅली आणि दिव्यांगांच्या रिक्षा रॅली करून तर शिवसेना पक्षाचे उमेदवार आनंद भरोसे यांच्या प्रचाराचा समारोप चित्र रथाच्या रॅलीने करण्यात आला.

****

परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी आज टपाली मतदान सुविधेच्या माध्यमातून परभणी येथील तहसील कार्यालयातील टपाली मतदान सुविधा केंद्रात मतदान करत आपला मतदानाचा हक्क बजावला.

****